आंतरराष्ट्रीय बहुभाषिक शोध पत्रिका

# प्रिंटिंग एरिया

## Printing Area International Interdisciplinary Research Journal in Marathi, Hindi & English Languages

April 2019, Issue-52, Vol-02

Editor
Dr. Bapu g. Gholap
(M.A.Mar.& Pol.Sci.,B.Ed.Ph.D.NET.)

Co-Editor
Dr. Ravindranath Kewat
(M.A. Ph.D.)

"Printed by: **Harshwardhan Publication Pvt.Ltd.** Published by **Ghodke Archana Rajendra** & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor **Dr. Gholap Bapu Ganpat.**

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205

Harshwardhan Publication Pvt.Ltd.
At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295
harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com

All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

14) EDUCATIONAL ASPIRATION OF HIGHER SECONDARY SCHOOL STUDENTS..... ||72
Ms. Nilima Chhotulal Sonar, Prof. Dr. H. Y. Deore, Dhule

15) IMPACT OF ADVANCE TECHNOLOGY ON EDUCATION SYSTEM ..... ||75
Dr. Manjush Awasthi, Dr. Brijesh Chandra Tripathi , lucknow

16) भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर : सामाजिक, शैक्षणिक , कार्य ||79
डॉ.रूद्राक्षे चंद्रकांत दशरथ,लोणी

17) सार्कमधील चीनचे आगमन– भारतापुढील आव्हान ||83
प्रा.डी.एम.ढवारे,वाशिम.

18) मराठवाड्यातील सुफी संताचे सामाजिक व शैक्षणिक योगदान ||86
प्रा. डॉ. किशोरकुमार गव्हाणे, भूम

19) व्यसनमुक्त समाज काळाची गरज ||90
प्रा. विवेक एस. गोर्लावार डचिरोली

20) स्त्री — पुरूष समानता आणि व्यवहार ||94
प्रा.कु. प्रज्ञा एस. वनमाली, गडचिरोली

21) मौर्य साम्राज्यातील न्यायव्यवस्था ||97
डॉ.हेमलता एफ. भावसार, कांचनमाला कांबळे (गवई)

22) "अग्रणी बैंकों द्वारा प्रसारित सम्भाव्यतायुक्त ऋण योजनायें एवं उनका मण्डल... ||100
डा०मुनीष कुमार, डा०जय प्रकाश (डी०लिट०), आगरा।

23) शरद पवार यांचे महिला धोरण ||106
प्रा. डॉ.सौ. वंदना विनायक नढे, ता.जुन्नर, पुणे.

24) ग्रामीण आणि शहरी क्षेत्रातील विद्यार्थ्यांच्या भावनिक बुद्धिमत्तेचे तुलनात्मक अध्ययन ||110
डॉ.आर.एल.निकोसे , विनोद वा. गेडाम, नागपूर

25) प्रकृति का उपभोक्तावादी कवि महेशचंद्र दिवाकर ||114
डॉ. हाशमबेग मिर्झा , सुदाम दौलत पाटील

26) महिला कैदियों की समस्यायें एवं जेल व्यवस्था ||119
श्रद्धा सोम सिंह, ग्वालियर (म.प्र.)

http://www.printingarea.blogspot.com | www.vidyawarta.com/03

दुसरे आशिया खंडात केवळ चीनच शक्तीशाली राष्ट्र असल्याची जगाला वारंवार जाणीव करुन देण्याचे कार्य चीन करत आहे. नजीकच्या काळात चीन हे पाकिस्तान, श्रीलंका, नेपाळ व अफगाणिस्तान याराष्ट्रांच्या माध्यमातून सार्कचा पूर्णवेळ सदस्य बनण्याची अधिक शक्यता आहे. चीनमधील अर्थशास्त्रज्ञांचे असे मत आहे की, सार्क संघटनेचा हवा तिकासा विकास होउ शकला नाही. जितका की आशियान किंवा युरोपीय युनियन सारख्या दुस–या संघटनांचा झालेला आहे. सार्कमधील देशामध्ये आपापसात असलेला आर्थिक व्यवहार हा त्यांच्या एकुण व्यवहारांच्या ५ टक्के देखील होत नाही. सार्कची स्थापनाच मुळात एक आर्थिक संघटन म्हणुन करण्यात आली होती. सार्क मधील आर्थिक व राजकीय संबध अधिक मजबुत व्हायला पाहिजे होते. जे दुरदैवाने झाले नाही. चीन सार्कचा पूर्ण वेळ सदस्य बनला तर त्याचा फायदा केवळ चीनलाच होणार नाही तर त्याचा फायदा सार्कमधील सदस्य राष्ट्रांनाही होईल. चीनचे सार्कमधील ८ पैकी पाच देशाशी राजकीय व आर्थिक संबध आहेत. चीनी अधिकारी सार्क प्लस वन देश किंवा सार्कमध्ये चीन संवाद सहभागी राष्ट्र बनण्याकरिता दबाव निर्माण करत आहे.

**संदर्भ ग्रंथ :–**

१पाटील, वा.भा, भारताचे परराष्ट्रीय धोरण, प्रशांत पब्लिकेशन्सन,जळगांव.प्रथम आवृती,२१ एप्रिल २०१५ पान क.३८

२ देवळांणकर, शैलेन्द्र, भारतीय परराष्ट्र धोरण : सातत्य आणि स्थित्यंतर प्रतिमा प्रकाशन पुणे २०१०, पान क.१५०.५१

३ निळू दामले, सार्क मध्येही पाकचा अडसरदै.सकाळ, सप्तरंग दि.३०/११/२०१६

४ भारव्दाज रामदेव, भारत एवं अन्तर्राष्ट्रीय सम्बन्ध मध्यप्रदेश हिन्दी ग्रंथ अकादमी, भोपाल.

५ शैलेंद्र देवळांणकर., भारताचे परराष्ट्र धोरण. (सातत्य आणि स्थित्यंतर), सकाळ प्रकाशन पुणे. तृतीय आवृत्ती नोव्हेबर २०१६ ६ यादव, आर. एस., भारत की विदेश नीति पेअरसन, दिल्ली. डॉर्लिंग किंडस्ले २०१३.

❑❑❑

**18**

# मराठवाड्यातील सुफी संताचे सामाजिक व शैक्षणिक योगदान

**प्रा. डॉ. किशोरकुमार गव्हाणे**
असो. प्रोफेसर,
एस.पी. कॉलेज भूम

**प्रस्तावना**

भारत प्राचीन काळापासून साधन संपत्तीच्या बाबतीत समृध्द आहे. म्हणूनच प्राचीन काळापासून ग्रीक, शक, कुशाण, पर्शियन, अरब या अक्रमकांनी आक्रमणे केली व भारताच्या काही प्रदेशावर सत्ता स्थापन केली. पुढे त्यांनी भारतीय भाषा, धर्म, व संस्कृतीचा स्वीकार केला. भारतीयांशी वैवाहिक संबंध जोडून हे आक्रमक भारतीय समाजात समाविष्ट झाले. या आक्रमकांच्या सहवासामुळे हिंदू समाजाच्या धर्म, भाषा, चालीरीतीवर निश्चितपणे प्रभाव पडला. मध्ययुगीन भारतात कुतूबद्दीन ऐबकने इस्लाम सत्तेची स्थापना केली. कुतुबद्दीन ऐबकने भारतात इस्लाम सत्तेची स्थापना केल्यावर अनेक सुफी साधूंचे आगमन भारतात झाले. त्यांचा उद्देश मवाळ मार्गाने भारतात इस्लामाचा प्रचार करणे हा होता. तुघलक घराण्याकडे दिल्लीची सत्ता आल्यानंतर उत्तर भारतातून शेकडो साधू संत सुफीचा प्रचार करण्यासाठी भारतभर पसरले. सुफी पंथ हा मुळातच उदारमतवादी विचारसरणीवर आधारलेला इस्लाम मधील एक धर्मविचार असल्याने अल्पावधीतच भारतीय समाजात तो रूजला. भारतात सर्वप्रथम अली अल हजबरी (गजबक्ष) नावाचा सुफी साधू आला. पुढील काळात ख्वाजा मुईनुद्दीन चिश्ती (अजमेर), बाबा फरिद्दिन, बाबा गेसुदराज, निजामुद्दीन, औलिया, गजशंकर, शेख सलिमुद्दीन चिश्ती इत्यादी सुफी संतानी आपल्या संप्रदायाचा भारतात प्रसार केला. त्यांच्या प्रसार कार्याला इस्लाम राजकर्त्यांचा पाठिंबा असे.

**सुफीचा मराठवाड्यातील प्रवेश**

सुफी संप्रदाय हा इस्लाममधील उदार विचार प्रणाली जपणारा भक्ती संप्रदाय आहे. सुफी पंथाच्या

उगमाबद्दल विविध मते मांडली जातात. एका परंपरेपासून सुफी संप्रदायाची सुरूवात हजरत महंमद पैगंबरापासून झाली असे मानले जाते. सुफीच्या भारतातील प्रवेश व प्रसाराबाबत इतिहासकारात एकवाक्यता नसली तरी खऱ्या अर्थाने सुफी संप्रदायाची स्थापना प्रसिध्द सुफी संत ख्वाजा मोईनुद्दीन चिश्ती यांच्या हिंदुस्थानातील प्रवेशाने झाली असे मानले जाते. कुराणात व महंमद पैगंबराच्या बोधवचनात सुफी पंथाची बीजे आढळून येतात. सुफीची व्याख्या करण्याचा प्रयत्न अनेक विचारवंतानी केला आहे. सुफ्फ्यावर (चबुतऱ्यावर) बसणारे ते सुफी अशी व्याख्या केली जाते.[१] इस्लामची शिकवण अंगीकरण्यासाठी मदिना शहराच्या मशिदीसमोर एका चबुतऱ्यावर लोक रात्रंदिवस थांबत असत. 'सुफी' हा शब्द साफ (शुध्द) पासून निर्माण झाला.[२] सुफीचा अर्थ लोकर किंवा जाडेभरडे वस्त्र असाही होतो. असे म्हणतात की, प्रेषित मोझोस ईश्वराला भेटायला गेले तेव्हा त्यांनी जाडेभरडे कपडे घातले हाते.

नवव्या शतकामध्ये इजिप्तमधील सुफी संत मौलाना नसरूद्दीन रोझा मुबारक हे औरंगाबाद शहराजवळ डोणगाव येथे स्थायीक झाले. या परिसरा मध्ये त्यांनी सुफी संप्रादयाचा प्रसार केला. पुढे १३ व्या शतकाच्या उत्तरार्धामध्ये दिल्लीत खिलजी घराण्याची सत्ता होती. याच दरम्यान दिल्ली येथील सुफी संत हजरत शेख निजामोद्दीन यांनी अनेक अनुयायांना तयार करून दक्षिणेत सुफी पंथाचा प्रचार व प्रसार करण्यासाठी आपला शिष्य हजरत मुन्तजीबोद्दीन उर्फ जरजरी बक्ष यांच्यासह ७०० अनुयायांना देऊन एक पालखी दक्षिणेत पाठविली. इ.स. १३०० मध्ये ही पालखी दिल्ली— बुऱ्हाणपूर मार्गे मराठवाड्यात औरंगाबाद जवळील खुलताबाद येथे आली. जरजरी बक्षने देवगिरीजवळ खुलताबाद येथे वास्तव्य करून आपल्या सोबत्यांना सुफी पंथाच्या प्रसारासाठी महाराष्ट्रभर पाठविले.[३] इ. स. १३०९ मध्ये जरजरी बक्षचा मृत्यु झाल्यानंतर त्याचा भाऊ बुऱ्हाणोद्दीन पुन्हा सातशे अनुयायांना घेवून दक्षिणेत आला. त्यांनी मराठवाड्यासह संपूर्ण महाराष्ट्रात व दक्षिण भारतामध्ये सुफीचा प्रचार व प्रसार केला. हजरत जरजरी बक्ष यांच्या बरोबर आलेल्या काही सुफी संताची माहिती उपलब्ध झाली असून वैजापूर येथे गाजी रूकनुद्दीन, गंगापूर येथे नानापाशा, पैठण येथे शहामोईजोद्दीन उर्फ मौलाना साहब, उदगीर येथे सय्यद सदबुद्दीन तर पुण्यामध्ये शेख सलाउद्दीन उर्फ सैलानी बाबा चिश्ती इत्यादी साधुंनी आपले मठ स्थापन करून सुफी पंथ प्रसाराचे कार्य केले.[४] सुफींची शिकवण समानतेची असल्याने व शांततामय मार्गाचा त्यांनी स्वीकार केला असल्याने प्रस्थापित अनेक लोक सुफी पंथाकडे आकर्षित झाले.

सुफी संताच्या कार्याबद्दल अनेक इतिहास करांनी, विद्वानांनी, अभ्यासकांनी व संशोधकांनी सुफी संत व त्याच्या कार्याबद्दल विविध अंगानी प्रकाश टाकला आहे. त्यामध्ये प्रामुख्याने सेतु माधवराव पगडी पासून ते मध्ययुगीन सुफी संत आणि संत साहित्यग्रंथ लिहणारे मुक्तेश्वर तिवारी, डॉ. शेख एजाज, डॉ. जाकेर पठाण, डॉ. रा.चि.ढेरे, डॉ. अलीम वकील, जय बहादुरलाल, पांडे चंद्रबली इत्यादी अनेक विद्वावानांनी सुफी संत, सुफी साहित्य व तत्वज्ञान, सुफी पंथ या बाबत उहापोह केला आहे. उपलब्ध माहितीवरून मराठवाड्यातील सुफी संताचे सामाजिक व शैक्षणिक कार्य हे फार मोठ्या प्रमाणात आहे. सुफीचे दक्षिणेतील केंद्र मराठवाड्यातील खुलताबाद असल्यामुळे व मी मराठवाड्याचा विद्यार्थी असल्याने सुफीच्या सामाजिक व शैक्षणिक कामगिरीचा आढावा घेण्यासाठी माझा हा प्रयत्न आहे.

**सुफी संताचे सामाजिक कार्य :— लंगर व यतिमखाने :**

मराठवाडा हा भाग पूर्वपार दुष्काळी भाग म्हणून ओळखला जाते. मध्ययुगीन कालखंडात म्हणजेच इस्लामसत्तेच्या काळात अनेक वेळा दुष्काळ पडल्याचे उल्लेख इतिहासामध्ये आढळतात. अशा दुष्काळी परिस्थितीमध्ये मराठवाड्यातील समाज हा दुष्काळ व रोगराई यांचा बळी ठरत असे.शेतकरी, शेतमजूर जनता दिशाहीन होत असे. अशावेळी स्थानिक प्रशासनाने त्या परिस्थित काही उपाय योजना करणे गरजेचे असते. अशा उपाय योजना तत्कालीन शासकांनी तात्पूरत्या स्वरूपात केल्याचे उल्लेख इतिहासात आहेत. पण त्याच बरोबर सुफी संतानाही अशा वेळी मराठवाड्यामध्ये सामाजिक जाणीव ठेवून लंगर (अन्न छत्रे) व यतिमखाने (अन्नालये) स्थापन करून उपेक्षित समाज घटकांची सेवा मोठ्या प्रमाणात केली.[५] बहामनी कालखंडात म्हणजे इ.स. १३१७ ते इ.स. १५१८ या काळात अनेकदा मराठवाड्यात दुष्काळ पडले होते. या वेळी सुफी संप्रदायाने मराठवाड्यातील अनेक ठिकाणी लंगर व यतिमखाने उभारले होते व उपेक्षित समाज घटकांची सेवा केली. त्यामुळे मराठवाड्यातील उपेक्षित समाज

घटकावर सुफी संप्रदायाच्या कार्याचा मोठा प्रभाव निर्माण झाला. दौलताबाद, खुल्दाबाद, धारूर, उदगिर, येथे आजही लंगर व यमितखान्याचे अवशेष मोठ्या प्रमाणात पहावयास मिळतात.[७]

यावरून असे दिसून येते की, यतीमखाने व लंगर दोन प्रकारची असावीत कारण मशिदी जवळही लंगर, यतिमखाने आढळतात, ती सुफी संतानी सुरू केलेली असावीत, तर राजकीय दृष्ट्या मोठ्या शहरामध्ये जी लंगर व यतिमखाने आढळतात. ती तात्कालीन शासकांनी स्थापन केलेली असावीत. म्हणजे तत्कालीन शासक व सम्राटा कडून अनुदानावर चालणारी लंगर व यतिमखाने एका बाजूला तर सुफी संता मार्फत लोकवर्गणीतून चालणारी लंगर व यतिमखाने अस्तित्वात होती. या इमारती चौकोनी व काही ठिकाणी गोलाकार स्वरूपाच्या आढळतात. अशा इमारतीचे खुल्दाबाद, औरंगाबाद अजिंठा, औरंगाबाद, हर्सुल, पैठण, जालना, धारूर, औसा इ. ठिकाणी अवशेष आजही आढळतात या ठीकाणी ५०० ते ७००० लोक एका वेळी जेवण घेत होते.[८]

**सुफी संताचे जलव्यवस्थापनातील योगदान :**

मराठी साहित्यामध्ये अगदी प्राचीन व मध्ययुगीन कालखंडात हिन्दू साधू संतांनी पर्यावरण व जलाचे महत्त्व सांगणाऱ्या अनेक रचना केलेल्या आहेत. आगदी १२ व्या शतकातील संत ज्ञानेश्वरानी आपल्या ज्ञानेश्वरी ग्रंथामध्ये पाण्याचे महत्व सांगणाऱ्या रचना–ओव्या लिहिल्या आहेत. संत ज्ञानेश्वरापासून ते तुकोबाराया पर्यंत सर्वच संतांनी पाणी आणि पर्यावरण यांचे महत्व सांगणाऱ्या रचना केलेल्या आहेत. त्याप्रमाणे सुफी संतानीही पाणी आणि पर्यावरण या विषयालाही महत्व दिले आहे. त्यामुळे त्यानी विविध ठिकाणी राहण्यासाठी (निवासासाठी) मशिदी, दर्गा, मदरसा, अनाथालये, अन्नछत्रे निर्माण केली. तसेच त्याच्या जवळ पाण्याची सोय व्हावी म्हणून विहिरी, आड, बारव व तलाव याची मोठ्या प्रमाणात निर्मीती केली. खुल्दाबाद, दौलताबाद परिसर,धारूर, औरंगाबाद येथे आज ही त्या काळातील या जलव्यवस्थापनाच्या सोई पाहावयास मिळतात. दौलताबादच्या पूर्वेला मशिदी लगत एक बारव अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण आढळतो. या बारवेचे वैशिष्ट्य म्हणजे तिच्या पाण्यावर आज ही शेती केली जाते व शेजारील वस्तीला यातून पाणी पुरवठा केला जातो.[९]

या बारवेला खाली उतरण्यासाठी गोलाकार पायऱ्या असुन जागोजागी कमानी तयार केलेल्या आहेत. शिवाय या बारवेच्या पूर्व दिशेला आतून छोटीशी मशिद आहे. धारूर येथील कसबा भागात असणाऱ्या मशिदी मध्ये ही एक बारव असुन आज ही ती वापरात आहे. या शिवाय काही दर्गाह जवळ तलाव, धरणे तयार केलेली आहेत. त्यामध्ये खुल्ताबाद ते दौलताबाद दरम्यान बनीबेगम तलाव, फतियाबाद तलाव, काजगीपूरा तलाव इ. सुफी संतांनी लोकसहभागातून व लोकवर्गणीतून तयार करून समाज उपयोगी कार्याला महत्त्व दिले. औरंगाबाद येथील सुफीसंत बाबा पंगलपोष यांनी हर्सूल (जटवाडा) परिसरातून भूमीगत पाणी आणून जुन्या औरंगाबाद परिसरात पाणी नहरीद्वारे खेळविले. याच नहरीद्वारे खेळविलेल्या पाण्यावर औरंगाबाद येथील प्रसिद्ध पाणचक्की तयार करण्यात आलेली आहे.[१०]

थोडक्यात सुफी संप्रदायाच्या साधू संतांनी समाज उपयेगी कामे करताना लंगर, यतिमखाने निवासासाठी मशिदी, दर्गे व पाण्याचे महत्व ओळखून जलव्यवस्थापना ला महत्व दिले. यामुळे मराठवाड्यातील सुफी संतांचा प्रभाव लवकरच दक्षिणेतील जनमाणसावर पडलेला दिसून येतो.

**मराठवाड्यातील सुफीसंतांचे शैक्षणिक कार्य:**

सुफी संप्रदायाचे भारतातील मुख्य केंद्र राजस्थानातील अजमेर हे होते. सुफी संत खाजा मुईनुद्दीन चिश्ती, यांच्या पासुन प्रेरणा घेवून अनेक सुफी शिष्य दक्षिणेत आले व खुल्दाबाद या ठिकाणी स्थिरावले तेव्हा पासून दक्षिणेतील सुफी संप्रदायाचे तेच मुख्य केंद्र होते. येथील प्रमुख सुफी संत जरजरबक्ष यांनी याठिकाणी अनेक शैक्षणिक केंद्र (दर्गाह) स्थापन करून मोठ्या प्रमाणात जनजागृती करून अनेकांना सुफी चळवळीत सामावून घेतले.

**मुसाफिर खाना, खानकाहे व कुतुबखाने :**

सुफी संप्रदयाची दिक्षा व शिक्षण हे पूर्वी मशिदीमधून दिले जात होते. पण नंतर पुढे मदरसा किंवा मकतबा बांधण्यास सुरूवात झाली. या मदरशातून सुफी संप्रदयाचे तत्त्वज्ञान देण्यास सुरूवात झाली. याच ठिकाणी मोठमोठे पुस्ताकालये (कूतुबखाना) तयार करण्यात आली. या मदरशातुन शिक्षण घेण्यासाठी असंख्य विद्यार्थी येवू लागले.[११] तेंव्हा त्यांच्या राहण्याची सोय म्हणुन ज्या इमारती बांधल्या त्यांना मुसाफिरखाना (पाहूणे राहण्याची जागा) म्हटले जाई. जरजरी बक्श या सुफी संतांने खुल्ताबाद येथे मोठी शौक्षणिक चळवळ उभी केली होती. ज्ञानार्जन, साधना, समाज प्रबोधन कार्यासाठी स्थापन केलेल्या या केंद्राला शैक्षणिक केंद्राचे स्वरूप प्राप्त झाले.[१२] या ठिकाणी शिक्षण घेऊन सुफी सांप्रदायाचे अनेक शिष्यपुढे धर्मप्रसारासाठी

दक्षिणेत खुल्ताबाद, विजापुर, हैद्राबाद, गुलबर्गा, श्रीगोंदा, अचलपूर, इ. ठिकाणी धर्म प्रसारासाठी पोहचले व त्यांनी ही अशाच प्रकारची शैक्षणिक केंद्राची उभारणी मराठवाड्यात व दक्षिण भारतात केली.[१३] गुरू—शिष्य परंपरा जपण्यासाठी, ज्ञानदानासाठी, शिष्यांचे जीवन शिस्तबध्द करण्यासाठी व चर्चासत्रासाठी, खानकाहची (हिंदू परंपरेतील मठाप्रमाणे) स्थापना झाली. गुरूंच्या आश्रमासारखे खानकाहचे स्वरूप असे. धवपळीच्या जीवनापासून लांब राहून अध्ययन, अध्यापन करणे सुलभ असते. एका किंवा अनेक शिष्यांना सुफी गुरूंनी अध्यापन केले. या प्रथेमधून खानकाहची निर्मिती झाली. त्या नुसार मराठवाड्यामध्ये दौलताबाद येथे शेख चाँद बोधले. उस्मानाबाद समशोद्दीन गांजी यांनी खानकाहे स्थापन करून ज्ञानार्जनास सुरूवात केली. तर उदगीरला सय्यद सदरोद्दीन, आंबड अल्लाउद्दीन बाबा, औरंगाबाद मुसाफिरशहा बाबा, पंलग पोष या शिवाय परभणी, नांदेड, पैठण, धारूर, नळदुर्ग, निलांगा इ. ठिकाणी अशाच प्रकारची खानकाहे निर्माण करून ही चळवळ सर्वत्र दक्षिणेत सुरू केली. मराठवाड्यामध्ये आज ही अशा प्रकारची खानकाहे काही ठिकाणी सुस्थितीत तर काही ठिकाणी अवशेष स्वरूपात आढळतात. या सर्वच केंद्रातुन धार्मीक व शौक्षणिक कार्य चालत होते. गुरू शिष्य एकत्र राहून शिकवण्यापेक्षा मार्गदर्शनावर याठिकाणी जास्त भर दिल्याचे दिसते. खानकाहमध्ये जास्त काळ वास्तव्य करावयाचे असेल तर खानकाहची कामे करावी लागत. या ठिकाणी सर्वजण एकत्र राहत, एकत्र खात व एकत्र झोपत असत. कुरआन हा धार्मिक ग्रंथ वाचण्यास व शिकण्यास सर्वांनाच खुला होता. एकेश्वरवाद हे इस्लामी सामाजिक जीवनाचे तत्व आहे, हे दर्शविण्यासाठी मध्ययुगीन खानकाह मुस्लिम संस्कृतीचे प्रभावी साधन बनले.[१४]

**समारोप**

मराठवाड्यात सूफी संतांनी जे कार्य केले. ते अत्यंत मौलिक व वाखण्याजोगे आहे. सूफी संताच्या कार्यामुळे दक्षिणेतच नव्हे तर संपूर्ण भारताच्या इतिहासाचा अभ्यास केला असता असे दिसून येते की, धार्मिक प्रचार व प्रसारासाठी धार्मिक छळ हे राज्यकर्तांचे शस्त्र असते पण सूफी संतांनी हे शस्त्र न वापरता आपल्या उदारमतवादी कार्याचा प्रभाव निर्माण करून जन उपयोगी कामे, स्थानिक भाषेमध्ये साहित्य निर्मिती, शैक्षणिक कार्यासाठी मठ तयार करून गुरू—शिष्य परंपरा निर्माण केली व या कार्यामध्ये पुरूषांच्या बरोबरीने स्त्रियांना संधी दिली. समाज प्रबोधन करताना सूफी संतांनी ईश्वर हा एक आहे व त्यांच्या जवळ पोहचण्यासाठी सर्वांना मान्य असणारा भक्ती मार्ग आहे. हे दाखवून दिल्यामुळे व सूफींची साधना, तपस्या, त्यांचे चारित्र्य पाहून, अनेक धर्मीय लोक त्यांच्याकडे आकर्षिक झाले. अशा लोकांनाच त्यांनी सूफी पंथाची शिक्षा दिली. म्हणून इस्लाम धर्म व सुफी संप्रदाय टिकून आहे हे सुफीच्या कार्याचे गमक म्हणता येईल.

**संदर्भ**

१. अलीम वकील— एका पथावरील दोन पंथ; भक्ती आणि सुफी, प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती— मे २०१२, पृ.क्र. २७.

२. लोन डॉ. गुलाम कादिर — मुताल्अ —ए—तसव्वुफ— कुरआन और हदीस के रोशीन मे (उर्दू) देहली, मरकजी, मक्तबा, इस्लामी पब्लिशर्स, १९९४ पृ.क्र. १९.

३. प्राचार्य डॉ. सावळे, डॉ. महाडीक व डॉ. गव्हाणे — मुघल कालीन भारताचा इतिहास, एज्युकेशनल पब्लिशर्स, औरंगाबाद, प्रथम आवृत्ती—जून २०१५ पृ. क्र. ३०५.

४. डॉ. झेड. ए. पठाण— भारतीय इतिहास आणि सांस्कृतीक इतिहास संशोधन मंडळाचे त्रैमासिक, जाने—मार्च २००६, पृ.क्र. ४८.

६. मुक्तेश्वर तिवारी, मध्ययुगीन सूफी और संत साहित्य, सरस्वती प्रकाशन मंदीर ६६ नया वौरहना—इस्लामाबाद प्रथम संस्करण, १९८० पृष्ठ क्र. ११२.

७. कित्ता पृ.क्र. ११३

८. डॉ. एजाज शेख — सुफी संप्रदाय, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, प्रथम आवृत्ती.२००९, पृ.क्र. ११३.

९. पुर्वोक्त— मुक्तेश्वर तिवारी, पृ.क्र. ११८

१०. राजपुजन तिवारी, सुफी मत साधना साहित्य, पृष्ठ २८०.

११. पुर्वोक्त— डॉ. झेड. ए. पठाण, पृ.क्र. ५०.

१२. कित्ता पृ.क्र. ०६

१३. डॉ. एजाज शेख, सूफी संप्रदाय, तत्वज्ञान, धार्मिक सामाजिक चिन्मय प्रकाशन औरंगाबाद २००९ पृष्ठ क्रं. ४१.

१४. निझामी के. ए. — रिलिजिअन्स ॲण्ड पॉलिटिक्स इन इंडिया, ड्युरिंग थर्टिंथ सेंचुरी (देहली इदाराही—इ—अदाबियत—इ—देहली) १९७४, पृ.क्र. १३५



S.P. Mahavidyalaya BHOOM Dist. Osmanabad
PRINCIPAL
S.P. Mahavidyalaya, Bhoom
Dist.Osmanabad